# प्रिन्स खेडकर यांची अंजनवेल हॉस्पिटलला साडेआठ लाख डॉलर्सची देणगी

न्यूयॉर्कचे रहिवासी प्रिन्सेस नेनेश्का खेडकर व प्रिन्स चित्रेश खेडकर यांच्या मृत्युपत्रातील निर्देशानुसार त्यांच्या इस्टेटीचा अर्धा भाग म्हणजे सुमारे ८ लाख ५० हजार डॉलर्सची रक्कम त्यांनी अंजनवेल येथे हॉस्पिटल बांधण्यासाठी दिली.

त्या रकमेच्या विनिमयासाठी आलेल्या विधेयकांमधून (प्रपोजल्समधून) युसूफ मेहेरअली सेंटर व महाराष्ट्र फाउण्डेशन यांनी संयुक्तपणे सादर केलेले प्रपोजल स्वीकारण्याचा निर्णय न्यूयॉर्कच्या सरोगेट कोर्टाने ११ आक्टोबर २००६ रोजी घेतला.

अमेरिकेत राहणाऱ्या अनिवासी मराठी माणसांच्या महाराष्ट्रात गुंतलेल्या धाग्यांमधून महाराष्ट्र फाउण्डेशन ही संस्था निर्माण झाली. गेली तीस वर्षे अनेक प्रकल्पांमधून ही संस्था भारतातल्या संस्थांना, गोरगरिबांना मदत करीत असते. महाराष्ट्राबाहेरही गुजराथ, केरळ या राज्यांमध्ये महाराष्ट्र फाउण्डेशनने कार्य केलं आहे. कै. खेडकरांच्या साडेआठ लाख डॉलर्सची रक्कम त्यांच्या इच्छेप्रमाणे काटेकोरपणे वितरित केली जावी म्हणून ती रक्कम फाउण्डेशनच्या मार्फत देण्याचा हा निर्णय म्हणजे फाउण्डेशनच्या नि:स्पृह कार्याची व यातून निर्माण झालेल्या विश्वासाची पावती आहे.

कै. खेडकर यांनी आपल्या मृत्युपत्रात आपली इस्टेट परस्परांना व त्यानंतर अर्धी इस्टेट न्यू हॅम्पशरच्या हॉस्पिटलला व अर्धी इस्टेट अंजनवेलला हॉस्पिटल बांधण्यासाठी द्यावी असं लिहून ठेवलं होतं. दुर्दैवाने १२ एप्रिल १९९३ रोजी त्या दोघांचाही खून झाला. खुनाचं प्रकरण असल्याने मृत्युपत्राच्या अंमलबजावणीला बराच अवकाश लागला. जून २००० मध्ये ही केस सरोगेट कोर्टात आली.

त्यानंतर न्यू हॅम्पशर हॉस्पिटलचा भाग त्यांना देण्यात आला. पण अंजनवेल कुठे आहे आणि त्याची रक्कम कोणाला द्यावी असा न्यूयॉर्कच्या अटर्नी जनरलला प्रश्न पडला. त्यांनी न्यूयॉर्कच्या भारतीय वकालतीशी संपर्क साधला. वकालतीने न्यूयॉर्कमधील समाज कार्यकर्ते डॉ. हरिया यांचं नाव सुचवलं.

हरियांकडे महाराष्ट्र व गुजराथ इथून ४-५ प्रपोजल्स आली. परंतु एवढी मोठी रक्कम अटर्नी जनरल पूर्ण खात्री झाल्याशिवाय सोडणार नव्हते. २००४ साली महाराष्ट्र फाउण्डेशन न्यूयॉर्क आणि युसूफ मेहेरअली सेंटर इंडिया यांनी एक संयुक्त विधेयक सादर केलं. यात २० बेडचं, १ ऑपरेशन रूम, १ मॅटर्निटी वॉर्ड असलेलं हॉस्पिटल अंजनवेलला बांधण्याचा प्रकल्प होता. याशिवाय ॲम्बुलन्स व आजूबाजूच्या २५ खेड्यांना ज्याचा लाभ होऊ शकेल असं मोबाईल क्लीनिक, वैद्यकीय प्रशिक्षण, टी. बी., नेत्रशिबिर अशा सोयींसकट 'Primary Health Center' उभारण्याची कल्पना होती.

या प्रकल्पाला ४ वर्षांचा कालावधी लागणार असून दरवर्षी किती व कसे पैसे खर्च केले जातील त्याचा अभ्यासपूर्ण अंदाज प्रकल्पामध्ये होता. ही कल्पना मृत्युपत्राशी मिळतीजुळती असली तरी सरकारी लालफितीतून निर्णय मिळायला विलंब लागत होता.

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या श्री. राजन गडकरी, सविता गोखले, अरविंद खांडेकर, सुनंदा माने यांनी व इतर अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करून, स्वखर्चाने अंजनवेलला भेट देऊन तिथली माहिती व प्रकल्पाच्या शक्याशक्यतेचा अंदाज (feasibility) अटर्नी जनरलला सादर केला. सर्व खटपटीनंतर बऱ्याच अटी घालून अटर्नी जनरलने या प्रपोजलसाठी पैसे देण्याचं मान्य केल्याचा निर्णय २८ डिसेंबर २००६ रोजी महाराष्ट्र फाउण्डेशनच्या हातात आला.

या निर्णयानुसार कोर्टाचा खर्च वजा जाता अंदाजे ८ लाख ५० हजार डॉलर्सची रक्कम हॉस्पिटल (अंजनवेलला) बांधण्यासाठी युसूफ मेहरअली या संस्थेला देण्यासाठी महाराष्ट्र फाउण्डेशनच्या स्वाधीन करण्यात येईल. हे पैसे वेगळं खातं उघडून फक्त याच कामासाठी खर्च केले जातील. त्यासाठीही बरीच बंधनं व कायदे आहेत. प्रपोजल ४ वर्षांचं जुनं असल्याने नवा आराखडा व वेळापत्रक सादर करावं लागेल. नंतर पैसे हातात येतील. पैसे हातात आल्यानंतरही महाराष्ट्र फाउण्डेशनला पुढची दोन वर्षं दर तीन महिन्यांनी चॅरिटी ब्युरोला पैशाचा हिशोब व कामाच्या प्रगतीचा रिपोर्ट सादर करावा लागेल. त्यानंतर पुढची ३ वर्षं दर सहा महिन्यांनी एक, शिवाय पूर्ण कालावधीत दरवर्षी एक आर्थिक अहवाल सादर करावा लागेल. ही जबाबदारी फाउण्डेशनने आनंदाने स्वीकारली आहे.

परदेशात राहूनही आपली संपत्ती मातृभूमीकडे परत पाठवणाऱ्या प्रिन्स खेडकरांच्या दिलदारपणाचं कौतुक करावं तेवढं थोडं! आणि १३ वर्ष लागली तरी मृत्युपत्राची काटेकोर अंमलबजावणी करून सत्पात्री दान पडावं याची दखल घेणाऱ्या अमेरिकेच्या कायदा पद्धतीचा आदर वाटतो. अमेरिकन सरकारचा हा विश्वास म्हणजे फाउण्डेशनच्या नि:स्पृह कार्याची पावती आहे.

**– नीलिमा कुलकर्णी**
कार्लक्स्बर्ग, न्यूजर्सी